# <u>वार्तापत्र</u>

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली दिनांक:- २८/०१/२०१८

## *गडचिरोली पोलीस दल आयोजित बिरसा मुंडा व्हॉलीबॉल स्पर्धेस प्रचंड प्रतिसाद*

- *<u>युवकांबरोबरच युवतींचाही स्पर्धेत हिरहिरीने सहभाग</u>*

मा. पोलीस अधिक्षक गडचिरोली डॉ. अभिनव देशमुख सो. यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली गडचिरोली पोलीस दल व्दारा आयोजीत बिरसा मुंडा व्हॉलीबॉल स्पर्धा-२०१८ या पोलीस स्टेशन, उपपोलीस स्टेशन, पोलीस मदत केंद्र स्तरावर भरविण्यात आल्या. या स्पर्धेला आदिवासी युवकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.

चामोर्शी येथे घेण्यात आलेल्या स्पर्धेत १५ संघानी सहभाग घेतला होता. यामध्ये आय.टी.आय. महाविद्यालयाच्या संघा ने अंतिम विजय मिळविला तर शरदचंद्र विद्यालय चामोर्शी येथील युवतींनी स्पर्धेतील सहभागी युवकांच्या संघावर मात करत तृतीय क्रमांक मिळविला. कोरची येथे झालेल्या स्पर्धेत ९ संघानी सहभाग नोंदविला होता तर अंतिम बाजी ग्रीन सीटी व्हॉलीबॉल संघाने मारली. असरअली पोलीस स्टेशन येथे भरवण्यात आलेल्या या स्पर्धेत एकुण २४ संघानी भाग घेतला होता. यामध्ये मौजा गुमलकोंडा येथील युवकांनी बाजी मारत प्रथम स्थान पटकाविले. पोमके गोडलवाही येथे १६ संघानी सहभाग घेतला होता. प्रथम क्रमांक मौजा गोडलवाही संघाने पटकाविला. रेगुंठा येथे झालेल्या स्पर्धेत १२ संघानी सहभाग नोंदविला यामध्ये मौजा परसेवाडा संघाने प्रथम क्रमांक पटकविला. अशाप्रकारे मोठया प्रमाणावर स्पर्धेला दुर्गम व अतिदुर्गम भागातील अनेक तरूणांनी प्रचंड प्रतिसाद दिला. या स्पर्धा २७ जानेवारी ते २५ फेब्रुवारी २०१८ पर्यंत या स्पर्धा भरविण्यात आल्या आहेत.

गडचिरोली जिल्हयातील आदिवासी युवक-युवतींच्या अंगी असलेल्या विविध कलागुणांना वाव देण्याकरीता तसेच त्यांना संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने गडचिरोली पोलीस दलामार्फत बिरसा मुडा व्हॉलीबॉल स्पर्धा-२०१८ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेमध्ये भाग घेण्याऱ्या संघाना नाष्टा व भोजनाची व्यवस्था यावेळी करण्यात आली होती.


स्टेशन चामोर्शी
आयोजित
स्पर्धा -२०१८
आयोजन -
दुसरा टप्पा
विभागीय स्तरावर
तिसरा टप्पा
जिल्हा स्तरावर
फेब्रु. ते ११ फेब्रु. २०१८
दि. २५ फेब्रु. २०१८
रोख पारितोषिक -
विभाग स्तर बक्षिस
जिल्हा स्तर बक्षिस
बक्षिस रु. ७०००/-
प्रथम बक्षिस रु. २५०००/-
व्दितीय बक्षिस रु. २००००/-
तृतीय बक्षिस रु. १५०००/-
दि. २७/१/२०१८ पासून
9405686331



